**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -माधव लक्ष्मणराव हेलुंडे

**सरतपास शपथेवर वादी तर्फे श्री एल.आर.मांडवकर यांच्या मार्फत सुरू.**

८. मी माझे पुराव्याचे शपथपत्र नि. क्र.१५ वर दाखल केले आहे. आता मला सदर शपथपत्र दाखविण्यात आले त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे. मी खालील दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले आहे.

**ए)** मी मौजा बेला येथील घर न.२६७२ ची मुळ करभरणा केल्याची पावती अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर ग्रामपंचायत सरपंचाचा सही शिक्का आहे त्यास **नि. क्र. १९** देण्यात आला.

**बी)** त्यानंतर मी न.भू.क्र.१०४९,१०४८ व १०५० चे तीन मालपत्तापत्रकाच्या डिजिटल कॉपी अभिलेखावर दाखल केल्या आहे. त्यास अनुक्रमे **नि. क्र. २० ते २२** देण्यात आला.

**सी)** त्यानंतर मी न.भू.क्र.१०४९,१०४८ व १०५० च्या नकाशाची सत्यप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर भूमिअभिलेख कार्यालय यांचा सही शिक्का आहे त्यास **नि. क्र. २३** देण्यात आला.

**डी)** त्यानंतर मी केशवराव लक्ष्मणराव हेलुंडे व सुभद्राबाई केशवराव हेलुंडे यांच्या नावाच्या घरमिळकतीच्या करभरणा केल्याच्या दोन पावत्या अभिलेखावर दाखल केल्या त्यास अनुक्रमे **नि. क्र.२४ व २५** देण्यात आला.

**इ)** त्यानंतर मी दि.१९/०४/२०२३ रोजी ग्रामपंचायतला तक्रार दिली होती त्या तक्रारीची स्थळप्रत अभिलेखावर दाखल केली त्यास **नि. क्र.२६** देण्यात आला.

**एफ)** त्यानंतर ग्रामपंचायतने प्रतिवादी क्र.१ यांना बेकायदेशीर बांधकामाबद्दल नोटीस दिला होता त्या नोटीसची प्रतिलिपी जी मला आली होती ती मी मुळ अभिलेखावर दाखल केली. त्यावर सरपंच ग्रामपंचायत, बेला यांचा सही शिक्का आहे त्यास **नि. क्र.२७** देण्यात आला.

**जी)** त्यानंतर ग्रामपंचायतने प्रतिवादी क्र.१ यांना बेकायदेशीर बांधकामाबद्दल नोटीस दिला होता त्या नोटीसची प्रतिलिपी जी वादी क्र.२ सुभद्रा यांना दिली होती ती मी मुळ अभिलेखावर दाखल केली. त्यावर सरपंच ग्रामपंचायत, बेला यांचा सही शिक्का आहे त्यास

**नि. क्र.२८** देण्यात आला.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>प्रतिवादी व प्रतिवादींच्या वकीलाचा पुकारा केला असता गैरहजर सबब प्रतिवादीच्या उलटतपासाकामी</u>**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्यायाधीश,क.स्तर,उमरेड
दि२८/०७/२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि.न्यायाधीश,क.स्तर,उमरेड